दु.क्र ०२०२४४७६९३८
Email-
sciencedept@maa.ac.in

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.

जा.क्र. राशैसंप्रपम /विवि /स्टार्स-पूरकसाहित्य /२०२२-२३/ 2148 दिनांक : 16/05/2023

प्रति,

- शिक्षणाधिकारी (प्राथ.) / (माध्य ), (सर्व जिल्हे),
- शिक्षण उपनिरीक्षक (दक्षिण/पश्चिम/उत्तर) मुंबई,
- शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी (सर्व म.न.पा./न.पा.),
- प्रशासन अधिकारी (सर्व नगर परिषद).

विषय :- समग्र शिक्षा व स्टार्स उपक्रम अंतर्गत शाळांकरिता निर्मिती करण्यात आलेल्या विद्यार्थी कार्यपुस्तिका, शिक्षक मार्गदर्शिका, पोस्टर्स, विद्याप्रवेश साहित्य यांची राज्यस्तर ते तालुकास्तरापर्यंत वाहतूक करणेबाबत....

संदर्भ :- १. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विभागीय कार्यालय, पुणे यांचे इमेल द्वारे प्राप्त पत्र दि. १०/०५/२०२३

२. प्रस्तुत कार्यालयाचा जा. क्र. रा. शै. सं.प्र.प. /वि.वि/स्टार्स पूरक साहित्य /२०२२-२३/२१०१ दि. १०/०५/२०२३ चा कार्यादेश

३. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय पुणे यांचे इमेल द्वारे प्राप्त पत्र दि. ११/०५/२०२३

४. विज्ञान विभाग प्रस्तुत कार्यालय यांचा मेल दि. १२/०५/२०२३

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे यांचेमार्फत स्टार्स प्रकल्प व समग्र शिक्षा अंतर्गत विद्यार्थ्यांना पूरक साहित्य निर्मिती करण्यात आली आहे. त्यानुषंगाने **इयत्ता सातवी ते दहावीच्या विद्यार्थी कार्यपुस्तिका, इयत्ता पहिली ते दुसरीच्या शिक्षक मार्गदर्शिका (Teacher Guidebook), शाळांसाठी पोस्टर्स व समता विभागाच्या दिशा शिक्षक मार्गदर्शिका, विद्याप्रवेश इयत्ता पहिली (विद्यार्थी कार्यपुस्तिका व शिक्षक मार्गदर्शिका)** या साहित्याचे विकसन करण्यात आले आहे. संदर्भ क्र २ नुसार राज्य परिवहन महामंडळाला सोबत जोडलेल्या तपशिलानुसार विकसित साहित्याचे तालुकानिहाय वाहतूक व वितरण करण्यासाठी कार्यादेश देण्यात आला आहे.

संदर्भ क्र. ४ नुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांतील समन्वयकाची यादी व सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार जिल्हानिहाय व तालुकानिहाय साहित्य यादी वाहतूक करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाला देण्यात आली आहे. तरी तालुका स्तरावर नियुक्त केलेले समन्वयक आणि संबंधित

विषयांचे सर्व विषय साधनव्यक्ती यांचेमार्फत सदर साहित्य ताब्यात घेऊन सुरक्षित ठेवावे आणि शाळास्तरावर साहित्य वाटपाचे नियोजन करावे. गटशिक्षणाधिकारी/तत्सम अधिकारी यांच्या मदतीने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ सुरु होण्यापूर्वी वरील तपशिलाप्रमाणे साहित्य शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी यांना वितरीत करण्यासाठी आपल्या स्तरांवरून योग्य ती कार्यवाही वेळेत करण्यात यावी. तसेच तालुका स्तरावर सर्व साहित्य वितरण अहवाल दप्तरी जतन करून ठेवावेत व त्याची एक प्रत प्रस्तुत कार्यालयाच्या sciencedept@maa.ac.in या इमेलवर पाठवावी.

**टीप- दिशा शिक्षक मार्गदर्शिका व  व Large print book (मराठी, इंग्रजी, व गणित) हे साहित्य समावेशित शिक्षण जिल्हा समन्वयक यांनी ताब्यात घेऊन संपूर्ण जिल्ह्यात साहित्य वाटपाचे नियोजन करून वितरण करावे.**

**सोबत साहित्य वितरण तपशील जोडला आहे**

(रमाकांत काठमोरे)
सहसंचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:**

१. मा. प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई.
२. मा.आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. मा.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव**

१. मा. शिक्षण संचालक, प्राथमिक, शिक्षण संचालनालय, पुणे
२. मा. शिक्षण संचालक, माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे
३. उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई
४. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व जिल्हे)

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव**

१. रुना ग्राफिक्स, पुणे
२. व्यवस्थापक, स्वारगेट आगार, राज्य परिवहन महामंडळ, पुणे.

## साहित्य वितरण तपशील

| अ.क्र. | साहित्य तपशील | विषय/विभाग | माध्यम | साहित्य वितरण कोणाला करावे ? |
|---|---|---|---|---|
| १ | इयत्ता सातवी ते दहावीच्या विद्यार्थी कार्यपुस्तिका | विज्ञान, मराठी, गणित, इंग्रजी | मराठी | सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या (जि.प.,मनपा.,नपा, कटक मंडळे इ.) इयत्ता सातवी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विषयानुसार प्रत्येकी एक प्रत देण्यात यावी. |
| २ | इयत्ता पहिली ते दुसरीच्या शिक्षक मार्गदर्शिका (Teacher Guidebook) | गणित, मराठी | मराठी | सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या (जि.प.,मनपा.,नपा, कटक मंडळे इ.) इयत्ता पहिली व दुसरीचे वर्ग असणाऱ्या शाळांना प्रत्येकी १ प्रत प्रत देण्यात यावी. |
| ३ | शाळांसाठी पोस्टर्स | गणित, मराठी, इंग्रजी, उर्दू | मराठी, उर्दू | सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या (जि.प.,मनपा.,नपा, कटक मंडळे इ.) केंद्रातील **मराठी माध्यमाच्या १००% शाळांना** १० पोस्टर्स ( मराठी -४, गणित - ४ व इंग्रजी -२ कोणतेही ) देण्यात यावे.<br>सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या (जि.प.,मनपा.,नपा, कटक मंडळे इ.) केंद्रातील **उर्दू माध्यमाच्या १००% शाळांना** १० पोस्टर्स (उर्दू -४, गणित - ४ व इंग्रजी -२ कोणतेही ) देण्यात यावे. (तालुका स्तरावर मराठी व उर्दू माध्यमाचे पोस्टर्स तपासूनच त्यांच्या वितरणाचे नियोजन करावे) |
| ४ | दिशा शिक्षक मार्गदर्शिका व Large print book | समता | मराठी | सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या (जि.प.,मनपा.,नपा, कटक मंडळे इ.) इयत्ता पाहिलीते सातवीच्या शाळेत दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांना **दिशा शिक्षक मार्गदर्शिका एकच प्रत** तसेच पहिली व दुसरीमध्ये शिकणाऱ्या तथापि अल्प दृष्टी असणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठी, इंग्रजी आणि गणित असा Large print book चा एक संच देण्यात यावा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | विद्याप्रवेश इयत्ता पहिली विद्यार्थी कार्यपुस्तिका व शिक्षक मार्गदर्शिका | मराठी | मराठी | सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या (जि.प.,मनपा.,नपा, कटक मंडळे इ.) मराठी माध्यमाच्या शाळेतील इयत्ता पहिलीच्या सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक विद्यार्थी कार्यपुस्तिका व सदर शाळेला एक शिक्षक मार्गदर्शिका देण्यात यावी. |
| | | उर्दू | उर्दू | सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या (जि.प.,मनपा.,नपा, कटक मंडळे इ.) उर्दू माध्यमाच्या शाळेतील इयत्ता पहिलीच्या सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक विद्यार्थी कार्यपुस्तिका व सदर शाळेला तीन शिक्षक मार्गदर्शिका देण्यात याव्यात. |

(रमाकांत काठमोरे)
सहसंचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद,महाराष्ट्र,पुणे.